# THE BOMBAY REPEALING AND AMENDING ACT, 1949
## (Bom. LIII of 1949)

## मुंबईचा (विवक्षित विधीं) रद्द करण्याबाबत व सुधारण्याबाबत अधिनियम, १९४९

### अनुक्रमणिका.


| | | पान |
|---|---|---|
| | प्रस्तावना. | |
| कलमें. | | |
| १. | लघु संज्ञा. ... ... ... ... ... ... ... | ८४ |
| २. | विवक्षित अधिनियम रद्द करणें ... ... ... ... ... | ८४ |
| ३. | विवक्षित अधिनियमांची सुधारणा ... ... ... ... ... | ८४ |
| | अनुसूचि एक. | |
| | अनुसूचि दोन. | |

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५३

[मुंबईचा (विवक्षित विधि) रद्द करण्याबाबत व सुधारण्याबाबत अधिनियम, १९४९]

[२८ नोव्हेंबर १९४९]

## विवक्षित विधी रद्द करणें व इतर विवक्षित विधीत सुधारणा करणें याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, पहिल्या अनुसूचीत निर्दिष्ट करण्यांत आलेले जे अधिनियम निरुपयोगी झाले आहेत अथवा अन्यथा अनावश्यक झाले आहेत अथवा जे अधिनियम विशेषतः स्पष्टपणें रद्द न करतां अन्यथा अंमलांत असण्याचें बंद झाले आहेत ते अधिनियम स्पष्टपणें व विशेषतः रद्द करणें इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, दुसऱ्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या विवक्षित अधिनियमांत विवक्षित सुधारणा करणें सुद्धा इष्ट आहे; त्याअर्थी, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. या अधिनियमास (अधिनियम) रद्द करण्याबाबत व सुधारण्याबाबत मुंबई अधिनियम, १९४९, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. पहिल्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेले अधिनियम हे त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभांत उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत याद्वारें रद्द करण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियम रद्द करणें.

३. दुसऱ्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांत, त्या अनुसूचींच्या चौथ्या स्तंभांत उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

### पहिली अनुसूचि

रद्द केलेले अधिनियम

(कलम २ पहा)

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | कोठवर रद्द करण्यांत आले तें |
|---|---|---|---|
| १८३० | ७ | कंपनी (सरकारच्या) मालकीच्या असलेल्या दक्षिणेंतील मराठा प्रदेशांत अंतर्भूत असलेल्या प्रदेशांना हे विनियम लागू करण्याबाबत व सदरहू प्रदेशांचा एक जिल्हा बनविण्याबाबत विनियम. | कलम ५. |
| १८३१ | १६ | सन १८३० चा विनियम ७, याचें कलम ५ च्या उबंधान्वयें, दक्षिणेंतील पोलिटिकल एजंटकडे निहित असलेलें क्षेत्राधिकार, सन १८३१ चा विनियम १, यांत निर्दिष्ट केलेल्या स्वरुपाच्या दिवाणी दाव्यांत हस्तक्षेप करतां येईल त्या मर्यादेपर्यंत वाढविण्याबाबत, तसेंच विशेष हक्क असलेल्या वर्गातील इसमासंबंधीं त्यावरुन मिळालेल्या क्षेत्राधिकाराची व्याख्या अधिक स्पष्ट करण्याबाबत विनियम. | सबंध. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | कोठवर रद्द करण्यांत आले तें |
|---|---|---|---|
| १८६७ | ६ | मुंबई शहराच्या आरोग्याचें नियमन करण्याबाबत अधिनियम, १८६७. | सबंध |
| १९०१ | १ | मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१. | कलम १५, पोट-कलम (२) ची कंडिका (ड). |
| १९२५ | १२ | सन १९३६ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४, याअन्वयें सुधारल्या-प्रमाणेचा सन १९२५ चा कापसातील सरकी काढण्याच्या व कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्याबाबत अधिनियम. | कलम ३-अ, पोट-कलम (१) यांतील "व ज्यास हा अधिनियम लागू असेल अशा" हे शब्द. |
| १९३२ | २ | मुंबई वित्त अधिनियम, १९३२ ... | कलम १४ मधील अनुसूचि २ च्या पहिल्या स्तंभांतील अनुच्छेद १७ संबंधीच्या नोंदीची कंडिका (२) मधील "आणि" हा शब्द. |
| १९३९ | १२ | मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९. | अनुसूचींतील नोंद क्रमांक ११. |
| १९४२ | २८ | मुंबई जमीन सुधारणा अधिनियम, १९४२. | (१) कलम २ ची कंडिका (६) व (२), कलम २२ मधील, "कलम १२, पोट-कलम (२)" हे शब्द, कंस व आंकडे. |
| १९४८ | ७१ | मुंबई बाल अधिनियम, १९४८ ... | (१) कलम ५६, पोट-कलम (१) मधील "मात्र त्याच्या पत्नीचें वय १४ वर्षांचे असेल तर" हे शब्द; आणि |
| | | | (२) कलम १०९, पोट-कलम (२) कंडिका (ड) मधील "गरीब" हा शब्द. |
| १९४८ | ७९ | मुंबई दुकानें व संस्था अधिनियम, १९४८. | (१) कलम १० "'पोट-कलम (१)" कंडिका (ब) मधील "मालाचा व्यापार करीत" हे शब्द ; |
| | | | (२) कलम ११, पोट-कलम (१), कंडिका (अ) मधील "मालाचा व्यापार करीत" हे शब्द. |

## दुसरी अनुसूचि.

### सुधारणा

(कलम ३ पहा)

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | कोठवर सुधारला तें |
|---|---|---|---|
| १८७९ | ५ | मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९. | कलम ५८ मध्यें—<br>(१) पोट-कलम (१) मधील, "त्यानें त्याबद्दल" या शद्वांनंतर "त्यास असा पैसा मिळेल त्यावेळीं", हा मजकूर.<br>(२) पोट-कलम (२) मधील, "त्यानें" हचा शब्दानंतर "त्यास अशी रक्कम मिळेल त्यावेळीं" हे शब्द ; आणि<br>(३) पोट-कलम (३) मधील, "त्यानें" या शब्दानंतर "त्यास अशी खंडाची किंवा जमीन महसुलाची रक्कम मिळेल त्यावेळीं" हे शब्द, दाखल करावे. |
| १८८९ | १ | मुंबई ग्राम आरोग्यरक्षण अधिनियम, १८८९. | (ही सुधारणा मराठींत केलेली आहे). |
| १८९० | ४ | मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९०. | (१) कलम ३ च्या कंडिका (अ) व (ब) मधील "या अधिनियमान्वये नेमलेला" या शब्दांऐवजी "कलम ४ अन्वयें ठेवलेला" हे शब्द दाखल करावें ; आणि<br>(२)सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५९ चें कलम ३, पोट-कलम (१२) अन्वयें दाखल केलेले नवीन कलम "६५-अ" यास "६५-अअ" हा नवीन क्रमांक देण्यांत यावा. |
| १८९२ | १ | मुंबईचा जिल्हचांत देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८९२. | अनुसूचि "ड" मधील नमुन्यांतील, "१८९१" या मजकुराऐवजी "१८९२" हा मजकूर दाखल करावा. |
| १९०२ | ४ | मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२. | (१) कलम ३ च्या कंडिका (ब) मध्यें, "या अधिनियमान्वयें" या शब्दांऐवजी "कलम ४ अन्वये स्थापलेला व ठेवलला" हे शब्द दाखल करावें ; आणि<br>(२) कलम ४०, पोट-कलम (१) मध्यें "याबाबत अधिकार दिलेल्या" या शब्दांपूर्वी "राज्य सरकारनें" हे शब्द दाखल करावें. |
| १९२० | १७ | मुंबईचा वकीलांबाबत अधिनियम, १९२०. | कलम ११,पोट-कलम (३) मध्यें "वकीलानें" या शब्दानंतर, "अशी फी त्यास मिळेल त्यावेळीं" हे शब्द दाखल करावें. |
| १९२५ | ७ | मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५. | (१) कलम ६४ मधील, "५०" या आकड्यानंतर "किंवा" शब्द दाखल करावा ; आणि<br>(२) कलम ७१,पोट-कलम (२) मध्यें,—<br>(अ) कंडिका (फफ) मधील, "क्रॉप-प्रोटेक्शन सोसायटी" या शब्दांऐवजी "फार्मिंग सोसायटी" हे शब्द दाखल करावे, आणि |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | कोठवर सुधारला तें |
|---|---|---|---|
| १९२५ | ७ | मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५—चालू. | (ब) कंडिका (केके) मधील, "पीक संरक्षक योजना" या शब्दांऐवजी "शेतीची योजना" हे शब्द दाखल करावे. |
| १९२५ | १२ | (सन १९३६ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४ वरून सुधारल्याप्रमाणेचा) कापसांतील सरकी काढण्याच्या व कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्याबाबत अधिनियम, १९२५. | कलम ५, पोट-कलम (४) मध्यें "केन्द्र सरकार निदेश देईल" या शब्दांऐवजी "त्यास योग्य वाटेल", हे शब्द दाखल करावे. |
| १९४२ | २८ | मुंबईचा जमीन सुधारणा योजना अधिनियम, १९४२. | कलमें १४, १६, २१ व २२ यांतील व कलम २५, पोट-कलम (४) मधील "जमीन सुधारणा अधिकारी" या शब्दांऐवजी "विभागीय जमीन संरक्षण अधिकाऱ्याचे" हे शब्द दाखल करावे. |
| १९४७ | २७ | मुंबई निकडीच्या प्रसंगी फटक्यांची शिक्षा देण्याबाबत अधिनियम, १९४७. | कलम २ मध्यें "कलमें" या शब्दाऐवजी "कलम" हा शब्द दाखल करावा. |
| १९४७ | ३१ | मुंबई सावकार अधिनियम, १९४६ | (१) कलम ३८ च्या समासांतील टीपेंत "सन १९३९ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २८" या मजकुराऐवजी "सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २८" हा मजकूर दाखल करावा.<br>(२) कलम ३८ मध्यें "१९३९" या आकड्यांऐवजी "१९४७" हे आंकडे दाखल करावे. |
| १९४७ | ५६ | मुंबई वखार अधिनियम, १९४७ ... | कलम २७ मध्यें "प्रत्येक वखारखात्यानें" या शब्दानंतर "वखारींत सांठवून ठेवण्यासाठी त्याला माल मिळेल त्यावेळीं", हें शब्द दाखल करावे. |
| १९४७ | ५७ | मुंबई भाडें नियंत्रण आणि पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७. | (१) कलमें २६, पोट-कलम (१) मधील "कोणत्याहि रकमेंबद्दल" या शब्दानंतर "अशी रक्कम त्यास मिळाली असेल त्यावेळीं" हे शब्द दाखल करावें ; आणि<br>(२) सदरहू कलम २६ च्या समासांतील टीपेंत "भाड्याबद्दल" या शब्दांऐवजी "मिळालेल्या कोणत्याही रकमेबद्दल" हे शब्द दाखल करावे. |
| १९४९ | २० | कर्नाटक विद्यापीठ अधिनियम, १९४९ | (१) कलम ३१, पोट-कलम (२) मध्यें, ")६)" या कंस व आकड्यांऐवजीं "(७)" हा आंकडा दाखल करावा; आणि<br>(२) अनुसूचीमध्यें, "(१४)" या कंस व आकड्यांऐवजी "(१५)" हा आंकडा दाखल करावा. |